ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : प्रवासी

लेखक : वा. भा. पाठक

प्रकाशक : पु. वि. करंदीकर, पुणे

प्रकाशन वर्ष : १९३४

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प
अंकेक्षण रूपांतर – २०२१



# प्रवासी

861·6

D.V.POTDAR LIBRARY
S P COLLEGE
D00925

861·6
Pat
5429

वा. भा. पाठक, एम्. ए.

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

किंमत ४ आणे

# प्रवासी

वा. भा. पाठक, एम्. ए.

— हें काव्य पुनः प्रकाशित करण्यास अनुमति दिली याबद्दल साप्ताहिक " सकाळचे " संपादक व प्रो. रा. वि. ओतुरकर यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोंत.

— तसेंच हें पुस्तक अल्पावधींत परंतु सुबक रीतीनें छापून दिलें याबद्दल श्री. चापेकर यांचे आभार मानणें जरूर आहे.

— प्रसिद्ध फोटोग्राफर श्री. वा. ना. भट यांनीं—मुख-पृष्ठावरील सचित्र सजावट करून दिली याबद्दल मी त्यांचा फार कृतज्ञ आहें.

— माझे प्रेमळ स्नेही श्री. ग. ह. पाटील, बी.ए., बी. टी., श्री. पु. वि. करंदीकर, बी. ए. व श्री. पण्डित सप्रे, ह्यांनाच " प्रवासी " आजच्या स्वरूपांत आणण्याचें सर्व श्रेय आहे हें सांगणें अत्यावश्यक होय.

म/६४४

कै. म. म. डॉ. द. वा. पोतदार
ग्रंथालय
दाखल क्र. 5429
ग्रंथांक 861.61 Pat
किंमत ........ तारीख 3/4/19

— काव्याला गंभीर विषयाची जोड पोषक होते आणि नाहींही ! – तथापि काव्याकरितां कोणी विशिष्ट विषयांची मुद्दाम योजनाही करीत नाहीं. शिवाय, विषयानें काव्याला नव्हे तर काव्यानेंच विषयाला शोभा चढलीसें दिसतें. म्हणूनच एकादा रुक्ष विषयही काव्यमय होण्यास अगर याच्या विरुद्ध स्थिति घडून येण्यास लेखकाची त्या त्या विषयाशीं कमीअधिक तन्मयताच कारणीभूत होते. सोबतच्या लिखाणांत तिचा कितपत भाग उतरला आहे हें पाहण्याचें काम रसिकाकडेच सोपविलेलें बरें !

— जीवितास प्रवास मानण्याची कल्पना सर्वत्र रूढ असली तरी सर्वांचे प्रवास मात्र एकसारखे नसतात. अनुभवपरत्वें ते भिन्न भिन्न होतात. म्हणूनच जीविताकडे पाहण्याचा एकाद्याचा दृष्टिकोन कसा बनतो हें पाहण्याचें कुतूहल प्रत्येकास असतें. आपलें व्यक्तिमत्व उघड करून सोबतचा प्रवासी ह्या कुतूहलाचें समाधान करील अशी आशा आहे.

— वा. भा. पाठक

# प्रवासी

होउनी चिंतार्त तो हे, शब्द तेव्हां बोलला
“ मार्ग माझ्या जीविताचा आज कोठें चालला !
रम्य मी पाहून शृङ्गें धावलों अद्रीकडे
सन्निधीं येतांच पायीं बोचले काटे खडे;
स्वर्धनू पाहूनि तेव्हां अंतरीं संतोषलों
लुप्त तें झालें श्रमी मी वाळवंटीं राहिलों !
कल्पनाकुंजांत पाणी भावनेचें शिंपुनी
रम्य मी उद्यान केलें भावि काला निर्मुनी !

## प्रवासी

ध्येयवृक्षीं गोड आशा-पक्षिणी झेपावल्या
आणि पाणी स्वर्नदीचें प्यावयाला धावल्या !
चंद्र-शाला त्या विशाला आज गेल्या भंगुनी
मात्र छायेमाजि आहे त्या स्मृतींच्या रंगुनी ! "

डोंगराच्या तो कडेनें चालला होता पुढें
भानही होतें न त्याला चाललों आहों कुठें !
जीविताचा काल चित्तीं आठवोनी मागचा
रंगला, गेला बुझोनी मार्ग भावी कालचा !
दूर त्याला भासलें तें स्वर्धरेचें मीलन
त्याच तो चाले दिशेनें संभ्रमीं कीं राहुन-

## प्रवासी

माळरानें मोठमोठीं चालला ओलांडित
जे पुढें पाषाण आले बाजुला ते लोटित
मोठमोठे वृक्ष मार्गी वल्लरी ज्या वेष्टुनी
सारुनी फांद्या तयांच्या, मार्ग काढी कष्टुनी
पाडसें केव्हां मृगांचीं हिंस्र किंवा श्वापदें
आडवीं येतां न झालीं मंद त्याचीं पाउलें
काक वा गावोत कोणी आम्रवृक्षीं कोकिल
हर्षला नाहीं विषादीं ना खचे त्याचें बळ !
वर्षला पाऊस मार्गी रम्य राई शोभली;
येउनी केव्हां हिंवाळा ती वनश्री लोपली
घेतला बुंध्यास त्यानें पादपाच्या आश्रय
वल्कलें लेवून किंवा राहिला तो निर्भय.

## प्रवासी

तीव्र केव्हां ते उन्हाळे मार्गि त्याला जाचले
माळ मोत्यांची कपाळीं घर्मबिंदू शोभले !
पाखरांचा ये थवा त्याच्या कधीं डोईवर–
सर्पही पायांत किंवा आडवा आला तर–
वाममार्गी धीर त्याला द्यावया ये भूधर
तोडुनी जाई सुखानें तो दरीचें अंतर
'पावता भूकंप पायीं वा कडा माथ्यावरी
कोसळो ना खंत ज्याला तो यशश्रीतें वरी !
चालुनी जावे पुढें ये रम्य तेव्हां ती स्थळी'
या विचारीं तो प्रवासी जाहला होता बळी
पांगलेले मेघ व्योमीं जो बघे हातीं धरूं
तारकांचे पुन्ज किंवा एक जागीं मेळवूं

## प्रवासी

चांदणें हातीं धराया बाल पाही बापुडें
चालला होता प्रवासी ध्येय गाठाया पुढें !

येउनी मागून त्याच्या जो पुढें वाहे झरा
लाविलें डोळ्यास त्यानें त्यांतलें पाणी जरा
ये तया थोडी हुषारी वायुवीची वाहता
हासुनी गालांत थोडें जाहला तो बोलता–
" जाहलों आतां प्रवासी ध्येय माझ्या पाठिशीं
काळ चालू रम्य माझा व्यर्थ चिंता कायशी !
हीं निसर्गोतील झाडें देति छाया शीतल
गोड हें पाणी झऱ्याचें सेवनाला निर्मल

## प्रवासी

चालतां मार्गांत येती पांखरें दृष्टीपुढें
मूक त्यांच्या गायनाचा ध्यास जीवाला जडे.
येतसे गाडी न घोडे येथ केव्हां आडवे
मात्र येतां मार्ग देतो दाउनी त्याला नवे !
जाल टाकायास येथें पारधी ना ये कुणी
दावितो वेडेपणा त्या मात्र येतां हांसुनी
जीवनाचा तीव्र अग्नी दूर लोकीं पेटला
रम्य या एकांत मार्गीं धूर त्याचा कोठला !
कुंपणें ज्यांच्या सभोंतीं तेथ बागा शोभती
हासतीं येथें सुखानें मोकळीं रानें किती !
गाजती विद्वान तेथें कोंडवाडे निर्मिती
बंधु हे निर्बुद्ध माझे स्वैर येथें नांदती !

## प्रवासी

तूं खुळा वेडा प्रवासी जाउं बा ! तेथें नको !
रम्य ती सृष्टी धुक्याची आंत बा ! पाहूं नको !
बाहुलें कीं लाकडाचें निर्मुनी त्या वानिती
देव जो पाषाण देती त्यांस ते प्राणाहुती
बांधिती मोठे मनोरे ते पहा प्रेतावरी
प्राण ये कंठीं न पाणी प्यावया त्याला परी !

आठवे–छत्रांत तेव्हां माउलीच्या राहुनी
थोर केले व्याप कीर्ती मेळवाया या जनीं
सोसुनी आघात नाना ज्ञान विद्या साधिली
होउनी आरूढ काया ध्येयचक्रीं भागली

## प्रवासी

सेवुनी गर्विष्ठ भारी मी धनाढ्यांची मती
पाळिली नाहीं मनाची वा रुचीचीही क्षिती !
शेवटीं येई यशाचें बाहुलें माझ्या करीं
घेउनी तें ठायिं ठायीं हिंडलों वाघ्यापरी !

शाळुच्या शेतांत ताटें खावयाला कोवळीं
आणि पाणी प्यावयाला शांत त्या भीमाजळीं
देउनी मोठ्या प्रमोदें हात दादाच्या करीं
पाडसाला घेउनी गेलों सवें घोड्यावरी
लोटतां पाणी मजेचें तेथ थारोळ्यावरी
पाय जों पाटांत माझे हर्षलों तों अंतरीं

## प्रवासी

खाउनी शेंगा तुरीच्या मोकळ्या रानामधें
शीळ घालोनी मुखानें हिंडलों मोदामधें
वाटलें नाहीं तदा तें मोददायी जीवन
आज मी काव्यात्म झालों आठवोनी ते दिन !
ठाउकें कोणास माझें चाललेलें जीवित
कीं कवी कोणी खुळा राहील काव्यीं गुंफित

देह जीचा कांचनाचा चित्त जीचें पुष्प कीं
वाहुनी प्रेमांत तीच्या दूर गेलों पुष्पकीं !
दृष्टिची माझी तियेची भेट थोडी हो न हो
देह तों माझा थरारे अंतरीं भूकंप हो

## प्रवासी

जाहले होते तियेचे नेत्र ओलेसे जरा
हासऱ्या शोभे मुखीं तो भाव थोडा लाजरा !
केस अस्ताव्यस्त होते ते कपोलीं लोळत !
राहिली होती उभी ती अंचलाशीं खेळत !
बोलली ' भाऊसवें या आमुच्या तुम्हीं घरा
पाहुनी आरास जा मी मांडली गौरीहरा '
घेउनी गेली निरोपा शब्द थोडे बोलुनी
त्या क्षणापासून तीतें चित्तिं गेलों स्थापुनी !
जाहलों होतों तृषेनें फार तेव्हां व्याकुळ
सोडली पायीं तियेच्या प्रेमभावें ओंजळ
व्यापुनी होता सभोंतीं राहिला कोलाहल
मात्र माझ्या देवतेला वाहिलें शांतीजल

नाटकाचें रूप आलें प्रेमभावा शेवटीं
व्हायची होतीच ना ती आमुची ताटातुटी !

जाह्ली स्फूर्ती मनाला काव्यमाला गुंफिल्या
जागुनी रात्री कितीदां मी उषा आलोकिल्या
पाहिला लांबून जों गंभीर तो काव्योदधी
प्रेमभावें सत्कवींच्या लीन झालों मी पदीं !
डुंबण्याला पल्वलींही धीर घेना अंतर
कोठुनी सामर्थ्य येई पोहण्या रत्नाकर
घेउनी तीरावरोनी बोल आलों बोबडे
लोक भोळे मानिले त्यांनीं हिरे माझे खडे !

## प्रवासी

वाटला त्यांच्या स्तुतीनें स्वर्ग तेव्हां ठेंगणा
एक मी लोकीं म्हणालों शाहणा कीं देखणा
मान्य ती प्राणाहुनीही वाटली व्याजस्तुती
ना कधीं ध्यानांत आलें त्यामुळें ये दुर्गती
आज ती लोपून गेली स्फूर्तिची दिव्यांगना !
जीव हा स्वप्नांतल्या लोभे तियेच्या दर्शना !

थोडका आवेश होता माझिया वाणीमधें
अल्पकाळीं लाभली तों वाहवा लोकांमधें !
लोट लोकांचे जमा जों जाहले माझ्या घरीं
लागल्या शोभावयाला कीर्तिच्या माला करीं

## प्रवासी

अंतरंगीं काय होतें ज्ञान तें ठावें मला
पोपटाचें सोंग लोकीं दाखवावें ती कला !
ज्या कलेनें मोहुनी मी जाहलों वेडा पिसा
कीर्तिची चित्तीं पिपासा मीन कीं जाळीं जसा
मात्र वीणेची तुटोनी तार गेली जेधवा
जाहली माझी पुन: नाहीं कदापी वाहवा !
प्रेम का निर्व्याज लोकीं सापडायाचें खरें !
लोपतां ऐश्वर्य कीर्ती दूर होती पांखरें !

पातलें चोहीकडे हें लोकशाहीचें युग
देश माझा दीन झाला पारतंत्र्यीं नाहक

## प्रवासी

राष्ट्रवीरांच्या स्मृतीनें चित्त हें प्रक्षाळिलें
हारही पायीं स्तुतींचे त्यांचिया अर्पीयले !
द्यावया स्फूर्ती जनातें व्यर्थ वाणी खर्चिली !
पाहिजे देशोन्नतीला ती न काया अर्पिली !
धन्यता पावेल का तो जो कडेला पोहतो ?
जो उडी आगींत घेई तो पुढारी शोभतो !
' संसृतीचा पाश माझ्या लागला आहे गळां '
ढोंग हें दाऊन सारें पाय मागें घेतला !

वाटलें जीवास केव्हां कीं नको संसार तो
वास का निर्गंध पुष्पीं हुंगुनी येणार तो ?

## प्रवासी

होउनी तत्त्वज्ञ गेले ठेउनी मागें कृती
वाचुनी सद्ग्रंथ त्यांचे शांतवावी ही मती
लागतें ऐश्वर्यभोगां मोजकें येथें धन
ह्यांचिया सत्सेवनाला पाहिजे इच्छा, मन
बोध देती सद्गुरूचा होउनी हे सेवक
ना कुणी लोकीं दुजा कीं ह्यापरी निर्हेतुक
जेधवां ग्रंथालयाचें पाहिलें मंदीर तें
सेवितां सन्मार्ग मोर्दे भागलों नाहीं तिथें
प्रार्थिलें देवा ! नको तो मोक्ष मातें कल्पित
लाभुं दे कीं भूवरीं या दिव्य ह्यांची संगत !

## प्रवासी

“ वाळवंटांतील वारा तापलेला वाहतो
होतसे आल्हाददायी कीं प्रभातांतील तो !
दीर्घ जे फूत्कार सोडी हे विषाचे पन्नग
तें गमे निर्व्याज हासे बालकाचें मोहक !
तीक्ष्ण जे काटे सराटे मार्गिं तेथें चाललों
पुष्पशय्येंतील सौख्यीं मात्र कैसें पावलों.
डोंब आगीचा जळे कीं तप्तभानू लोचनीं
वृष्टि वाटे कीं सुधेची चंद्र फेकी त्यांतुनी !
स्फोट हे लाव्हा रसाचे देह माझा वेष्टिती
वाटतें राशी हिमाच्या शीत खालीं लोटती !
रुद्ररूपा पाहुनी भूपृष्ठ सारें कापलें
स्तब्ध वाटे कीं जलीं नौका पुढें मागें हले !

व्यापुनी ब्रह्माण्ड राहे देवदत्ताचा रव
कोकिलालांपातलें कां भासतें हें मार्दव
संसृतीतापांत देवा ! देह माझा पोळतां
लाभते तूझ्या स्मृतीनें गोड चित्तीं शांतता !

मानिलें अस्तित्व 'ऐसें' ईश्वराचें मानसीं
आणि केली गोड सेवा हातुनी झाली तशी
लांब बागेंतून पुष्पें आणुनीयां वाहिलीं
नम्रभावें प्रार्थिलें त्या जोडुनीयां अंजली !
हे प्रभो देवाधिदेवा सर्वसाक्षी ईश्वरा !
तार तूं या बालकाला मार्ग दावोनी बरा !

## प्रवासी

मंदबुद्धी ज्ञान कोतें चित्त माझें चंचल
शांततेचा मार्ग त्याला दाउनी दे निश्चल.
मित्रमेळा मेळवूनी गोड केल्या आरत्या
हर्षलों टाळ्या पिटोनी फेकिल्या मंत्राक्षता
दर्शनाला मूर्तिच्या मी धावलों गर्दीमधें
आज एकांतींहि त्याचें रूप मातें ताप दे
पाहुनी पाषाण ज्यांचे चित्त पावे शांतता
रम्य ते अज्ञान कोणी वांछिती त्या जीविता
तें नको अज्ञान मातें स्थैर्य तें खोटें नको
नाश पावो संशयात्मा शांतता खोटी नको,
धर्म सारे रम्य लोकीं दूरचे कीं डोंगर
पायथ्याशीं माजले काट्यासराट्यांचे थर

माखुनी रक्तांत जाती लोक वेडे भावडे
धन्यता संस्थापकांच्या मात्र ती कंठीं पडे !"

चंचले हे तारके गे धन्य तूतें मी नमीं
तेज नाहीं जाहलें थोडें तुझें केव्हां कमी !
आणि बाळा निर्झरा तूं मूर्ति चांचल्यांतली
तूझिया गोडी जलाची यामुळें कां वाढली !
आज तूं येथें उद्यां स्वर्गांत फेरी घालसी
स्थैर्य नाहीं मारुता तूं सौख्य आम्हां अर्पिसी
चाललें मेघांत मोठें हें विजेचें नर्तन
दृष्टिला सौंदर्य तीचें मोह ठेवी घालुन.

## प्रवासी

जाहलें चांचल्य विश्वीं चारुतेनें मण्डित
जीविताचा मी प्रवासी काय नाहीं शोभत !

“ जीविताची लोट नौका रम्य त्या सौख्यार्णवीं
जाउं दे अज्ञात तीरा खंत त्याची कां हवी !
तूं प्रवासी उद्यमाचें घेउनी वल्हें करीं
रे यशस्वी हो खलाशी संकटाच्या सागरीं ”
गोड तो चित्तांत ! आशावाद तेव्हां बिंबला
बांधिले भावी मनोरे जीव माझा रंगला
किन्नरांचे जेंवि वाडे शोभती मेघावरी
आणि येती ढासळोनी, खेळ झाला त्या परी !

## प्रवासी

गंध पुष्पाचा निमावा वाहत्या वाऱ्यावरी
शुष्क पाचोळा उडावा वायुयानीं अंबरीं !
फेंस पाण्याचा विरावा जागच्या जागीं जसा
जीविताचा काल माझ्या जाय कालौघीं तसा
शोभती सूर्यांचिया जैसे करीं धूलीकण
रम्य अंतश्चक्षुला ते भासती गेले क्षण !

—गात हें गाणें प्रवासी चालला होता पुढें
नाकळे पाऊल कीं त्या आपुलें मागें पडे
"माझिया डाव्या कडेला जो उभा राहे कडा
जाहला तो जीविताचा पाठिराखा केवढा !

## प्रवासी

लांब त्याची दाट छाया संचरे मार्गांतुनी
श्रान्त नाहीं जाहलों मी चालतांना तेथुनी
स्वर्ग कोठें दूर, आल्या वायुवीची वाहुनी
दीन मी माया मला निर्लोभ गेल्या दाउनी.
पूर्वीचा संबंध माझा निर्झरा ! तो कायसा
राहसी सेवेस माझ्या नेहमीं जागा कसा !
ऐकतां संगीत जीवा लाभते संजीवनी
जाणुनी हें कोकिळे तूं तोषवीलें गाउनी !
गालिचे दूर्वांकुरांचे आवडीचे लाभले
प्रेम हें निर्व्याज सारें तूं वनश्री दाविलें !
मारिता तुम्ही भरारी पाखरांनों ! अंबरीं
धीर येई ध्येयमार्गीं चालुनी आलों दुरी !

## प्रवासी

वृत्ति माझी पाहुनी माना तुम्ही डोलाविल्या
वृक्षराया ! तूं शिरीं पुष्पांजलीही अर्पिल्या
दाविली भारी दया पाषाणखंडा तूं मला
गोडशी शय्या दिली ना माझिया विश्रांतिला !
मार्ग होता जेधवां माझा धुक्यांनीं दाटला
सौम्य तेव्हां तो करांहीं भास्करा केला खुला
हे उषे सौंदर्यदेवी, मार्गिं माझ्या चारुता
आणिली, व्याजस्तुती हो मात्र तूतें वानिता
इष्ट माझा पाहुनीया छत्र हें तारांकिता
टाकिलें अंगावरी माझ्या निशे ! गे झोपतां
स्वप्नरंगीं रंगलों मी पाहुनी भूसुंदरी
"घेउनी हातीं निसर्गा नाचतां ती अंबरीं

## प्रवासी

इंद्रचापाचा तियेनें गोफ कंठीं घातला
तेंवि सोनेरी विजेची मध्यभागीं मेखला
शोभले पायीं हिऱ्यांचे ते दंवाचे नूपुर
भोंवती फेंकी प्रभा ती लेवुनी दिव्यांबर"
जावयाची वेळ आली सोडुनी आतां तुम्हां
दोष जे झाले तयांची मागतों आहें क्षमा
लोभ ठेवा पूर्विचा तो दीन या बंधूवरी
आपुला माझा घडो संबंध हा जन्मांतरीं !
अश्रु आले लोचनीं तो फार दुःखी जाहला
स्तब्ध तो झाला न बोले कंठ त्याचा दाटला.

## प्रवासी

घालुनी वेढा पुढें तो डोंगराला चालला
जेथुनी होता निघाला तेथ अंतीं पातला
मागुनी येऊन त्याच्या जो पुढें वाहे झरा
पाहुनी त्याचेकडे तो हासुनी बोले जरा.
"जेथुनी होतों निघालों तेथ मी आलों पुन्हां;
दीपकाच्या भोंवतीं फेरी पतंगाचीच ना!
काय हातीं लागले! संदेश हातीं काय ये!
ज्ञातअज्ञातांत जीवा व्यर्थ तू भागूं नये!
बोलसी अज्ञात आहे ज्ञात तें सूर्यापरी
ज्ञात जें राहे निशेची अंधता तेथे परी!
वाटलें जें स्वर्धरेचें दूर मातें मीलन
तेंच मी मार्गांत होतों नित्य पायीं चालुन

## प्रवासी

संभ्रमाचें दाटलें होतें धुकें मागें पुढें
आज तें सारें विरे –" तो हासुनी बोले पुढें,
" यापुढें बोलावयाचें हेंच कीं बोलूं नये
यापुढें चालावयाचें हेंच कीं चालूं नये
तोच कीं माझा विसावा जेथुनी मी चालतों
वाटतें जें दूर त्याच्या सन्निधीं मी राहतों ! "
एवढें बोलून त्यानें कंठ केला मोकळा
प्यावया पाणी झऱ्याचें तो जरासा वाकला
पाठिचें ओझें तरूच्या टाकिलें त्यानें तळीं
हात घेवोनी उशाला झोपला रम्य स्थळीं !

## प्रवासी

झोपु द्या त्याला सुखानें बांधवानो ! झोंपु द्या !
जागच्या जागींच सारी भ्रांत त्याची राहुं द्या !
भ्रांत जी शोभे तयाला तत्त्व वाटे आपणा !
बोलला तो शोभलें त्या थोर लोकीं तो म्हणा !

---

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पृष्ठें १४०<br>किं. १ रुपाया | ] | **'आशागीत'**<br>ओढणी व इतर कविता | [ | ले. वा. भा.<br>पाठक, एम्. ए. |

**प्रस्तावनालेखक प्र. के. अत्रे**

......चिंतनशीलता व भावनेची आर्तता या दोन विषेशांची छाया कवितेंत बरीच दिसली......ओढणींतील अभंग पुष्कळ ठिकाणीं उत्तम साधले आहेत......त्यांत व्यक्त झालेल्या भावना व कल्पना सुंदर आहेत. **न. चिं. केळकर**

......गोड गोड विविध वृत्तें, साधी सोपी भाषा, मनोहर कल्पना आणि निर्मळ भावना यांचा साठा रा. पाठक यांचे जवळ भरपूर आहे...... **प्रो. द. वा. पोतदार**

......सर्व काव्य स्वयंस्फूर्त, अनुभवासिद्ध, प्रासादिक आणि सहज गाइलेलें असें वाटतें......**श्री. म. माटे**

......आर्तता आणि कल्पकता यांचा सुंदर मेळ अभंगांत पडलेला आहे......**महाराष्ट्र.**

......श्री. पाठकांच्या कवितेचें वळण स्वतंत्र असून तिच्यांत भावना व विचार यांचा सुंदर मिलाफ झाला आहे.

प्रो. गो. वि. तुळपुळे.

......भाषेचा साधेपणा व माधुर्य आणि भावनेचा उदात्तपणा हे गुण आशागीतांत पहावयास सांपडतात. नी.वा.किंकर

......आधुनिक युगांतील भारतीय तरुणांच्या हृदयाचें आशागीत कांहीं अंशीं प्रतीकच होय. ......विहंगम.

......संसाराच्या नेहमींच्या गोष्टी, नेहमींचे प्रसंग, त्यांत आढळून येणाऱ्या भावनांचा खेळ, अंतःकरणाची मूक भाषा यांचें चित्र रेखाटण्यांत पाठक निपुण आहेत. ......नवाकाळ.

[ मिळण्याचें ठिकाणः— आर्यसंस्कृति मुद्रणालय, पुणें. ]

---

**स्नेहप्रभा :**— (कलामण्डळाचें प्रथम प्रकाशन, किं. ६ आणे) यांत श्री. रा. मा. कुलकर्णी, बी.ए., श्री. पु. वि. करंदीकर, बी.ए., श्री. पण्डित सप्रे, श्री. अ. ह. जोशी.

श्री. दत्तात्रय वगैरे सदस्यांचा निवडक कवितासंग्रह; केसरी, ज्ञानप्रकाश, प्रतिभा–महाराष्ट्र–वगैरेंचे उत्तम अभिप्राय. पत्ता पु. वि. करंदीकर ८१५ सदाशिव पुणें.

---

**रानजाई :—** श्री. गणेश हरी पाटील, बी. ए., बी. टी. यांचा निवडक कवितासंग्रह लवकरच प्रसिद्ध होईल.

**बालशारदा :—** संग्राहक–ग. ह. पाटील, ( द्वितीय आवृत्ति लौकरच निघेल. )

---

प्रकाशकः श्री. पु. वि. करंदीकर आणि वि. गं. सप्रे,
८१५ सदाशिव, पुणें २.
मुद्रक : ल. ना. चापेकर, आर्यसंस्कृति मुद्रणालय,
१९८(१७) सदाशिव, पुणें २.